## रु. २ व रु. ५ ची नोटा व नाणी
## कायदेशीर चलन आहेत

काही शहरांमधील काही ठिकाणी जाहिराती लागल्या आहेत की रु. २ व रु. ५ च्या दर्शनी किमतीच्या नोटा व नाणी आता कायदेशीर चलन राहिलेली नाहीत. मात्र ही बातमी बिनबुडाची व दिशाभूल करणारी आहे. रिझर्व्ह बँक स्पष्ट करु इच्छिते, की रु.२ व रु.५ च्या नोटा व नाणी कायदेशीर चलन आहेत. जनतेने या नोटा व नाण्यांचा वापर व्यवहारात मुक्तपणे करण्यास हरकत नाही व अशा भुलथापांना त्यांनी बळी पडू नये.

**एन एल राम**
**सहाय्यक व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००१-२००२ / ६२१**